N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** माजलगांव शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/03/2025 04:47

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 05/03/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 06/03/2025
**Time From (वेळेपासून):** 17:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 04:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/03/2025 **Time (वेळ):** 04:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/03/2025 04:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय, माजलगा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मुकुंद नामदेव वैद्य

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1996

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सिध्देश्वर नगर, शिंपेटाकळी ता,माजलगाव,माजलगांव ग्रामीण ,बीड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | सिध्देश्वर नगर, शिंपेटाकळी ता,माजलगाव,माजलगांव ग्रामीण ,बीड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8605161707

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय गोपीनाथ पवार | | | 1. मंजरथ रोड, भाटवडगाव ता , माजलगाव,माजलगांव शहर,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | एक मेमरी कार्ड व लाच रक्कम | 11,500.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | 11500/रुपये 500/रुपये दराच्या 21 नोटा 200/रु. दराच्या 5 नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

ला. प्र.वि. बीड दिनांक:- 06/03/2025.

मी मुकुंद नामदेव वैद्य, वय-29 वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.सिध्देश्वर नगर, शिंपेटाकळी ता.माजलगाव जि.बीड ह.मु. चोराखळी ता.कळंब जि.धाराशीव मो.क्र.8605161707 ( JIO ) आधार कार्ड क्रमांक 8697 2645 2546. मी दि.05/03/2025 रोजी शिवप्रताप मंगल कार्यालय, तेलगाव रोड, माजलगाव येथे सुरक्षीत ठिकाणी हजर येवुन श्री.युनुस शेख, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचेसमक्ष तक्रार दिली की, "माझे नातेवाईक श्री.अकुंश बाबासाहेब गवते रा.शिंपे टाकळी यांचे नावे मौजे शिंपे टाकळी ता.माजलगाव जि.बीड येथे गट नंबर 22 मधील 25 आर जमीन पैकी 1 आर जमीन त्यांचे संमतीने माझे वडील श्री.नामदेव सखाराम वैद्य यांचे नावे गाव नमुना नंबर 8 ला नोंद करुन पिटीआर मिळणे करीता ग्राम पंचायत कार्यालय, शिंपे टाकळी ता.माजलगाव चे ग्रामसेवक श्री.पवार हे माझ्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी करत आहेत " वगैरे मजकुराची तक्रार दिली. माझे तक्रारीचे अनुषंगाने पोनि/शेख यांनी दि.05/03/2025 रोजी श्री.पवार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिंपे टाकळी ता.माजलगाव हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्र.1 श्री.कुर्लेकर यांना श्री.पवार यांचेकडे माजलगाव येथील तहसील कार्यालयजवळील श्री.आगे यांचे झेरॉक्सचे दुकानावर पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/शेख यांनी मला व पंचांना एकंदरीत सापळा कारवाई कशी असते ? याबाबत सविस्तर माहिती दिली. पोनि/शेख यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोनि/शेख यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये स्वत:, दोन्ही पंच व माझे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर पोनि/शेख यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र-1 श्री.कुर्लेकर यांना ग्रामसेवक श्री.पवार यांना भेटण्यासाठी माजलगाव येथील तहसील कार्यालयजवळील श्री.आगे यांचे झेरॉक्सचे दुकानाकडे रवाना केले. मी व पंच क्र. 1 श्री.कुर्लेकर असे माझ्याकडील मोटार सायकलने ग्रामसेवक श्री.पवार यांना भेटण्यासाठी जात असतांना मी ग्रामसेवक श्री.पवार यांना फोन केला असता त्यांनी मला डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, माजलगाव येथील पंचवटी हॉटेल समोर बालविले. त्यावरुन आम्ही पंचवटी हॉटेल जवळ जावुन ग्रामसेवक श्री.पवार यांना परत फोन केला असता, त्यांनी मला सेव्हन स्टार हॉटेलमध्ये येण्यास सांगितले. त्यावर सदर हॉटेलमध्ये माझी व ग्रामसेवक श्री.पवार यांची भेट झाली. त्यानंतर मी, पंच क्र.1 व ग्रामसेवक श्री.पवार असे सेव्हन स्टार हॉटेल समोरील दोस्ताना ज्युस सेंन्टर येथे गेलो. तेथे माझी व ग्रामसेवक श्री.पवार यांची माझे कामा संदर्भाने चर्चा होऊन त्यांनी मला माझे नातेवाईक श्री.अकुंश बाबासाहेब गवते यांचे नावे मौजे शिंपे टाकळी ता.माजलगाव जि.बीड येथे गट नंबर 22 मधील 25 आर जमीन पैकी 1 आर जमीन त्यांचे संमतीने माझे वडील श्री.नामदेव सखाराम वैद्य यांचे नावे गाव नमुना नंबर 8 ला नोंद करुन पिटीआर देण्यासाठी 12,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 11,500/-रुपये खाजगी इमस मनोज दुगाने यांचे मार्फतीने स्विकारण्याचे मान्य केले.

त्यानुसार पोनि/शेख यांनी मला व दोन्ही पंचांना खाजगी इमस मनोज दुगाने यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा

आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी पोनि/शेख यांना खाजगी इसम मनोज दुगाने हे आमचे गावचे रहिवाशी असुन माझे नातेवाईक असल्याने त्यांचे विरुद्ध सापळा न आजमिवता ग्रामसेवक श्री.पवार यांचे विरुद्ध सापळा कारवाईचे आयोजन करण्याची विनंती केली. त्यावरुन ग्रामसेवक श्री.पवार यांचे विरुद्ध सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. पोनि/शेख यांनी वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

पोनि/शेख यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/शेख यांनी माझे कडुन सापळा करवाईसाठी लागणारे 11,500/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या 21 नोटा व 200/-रुपये दराच्या 5 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्र.-2 श्री. वडचकर यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास अँथ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/शेख यांनी मला ग्रामसेवक श्री.पवार यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेले 11,500/-रुपये काढुन ग्रामसेवक श्री.पवार यांना द्याव्यात व अंगावरील शर्टच्या दोन्ही हाताच्या बाह्या दुमडुन वर घ्याव्यात असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोनि/शेख यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.-1 श्री.कुर्लेकर यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 11,500/-रु. लाच रक्कम ग्रामसेवक श्री.पवार यांना देण्यासाठी पंचायत समिती कार्यालय, माजलगाव येथे रवाना केले. पोनि/शेख हे पंच क्र.2 श्री. वडचकर व सापळा पथकासह शासकीय वाहनाने आमचे पाठोपाठ येत होते. मी व पंच क्र.1 श्री.कुर्लेकर असे माझे कडील मोटार सायकलने पंचायत समिती, माजलगाव समोर गेलो. तेथे गेल्यानंतर मी ग्रामसेवक श्री.पवार यांना फोन लावला असता, त्यांनी मला पंचायत समिती कार्यालयाचे आतमध्ये येण्यास सांगितल्याने मी व पंच क्र.1 असे कार्यालयात गेलो. त्याठिकाणी कार्यालयाचे गेटवर माझी व ग्रामसेवक श्री.पवार यांची भेट झाली. त्यानंतर मी, पंच क्र.1 श्री.कुर्लेकर व ग्रामसेवक श्री.पवार असे कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील कृषी विभागाचे कक्षात गेलोत. त्या ठिकाणी माझी व ग्रामसेवक श्री.पवार यांचेत माझे कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान ग्रामसेवक श्री.पवार यांनी माझ्याकडे इशाऱ्याने लाचेची मागणी करुन "फाईल ठेवुन दे" असे म्हणुन लाच रक्कम व घरकुल योजनेची फाईल लाकडी छोट्या कपाटाचा दरवाजा उघडुन ठेवण्यास सांगितले. त्यावरुन मी सदर लाकडी कपाटाचा दरवाजा उजव्या हाताने उघडुन उजव्या हाताने पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 11,500/-रुपये बाहेर काढून ग्रामसेवक श्री.पवार यांचे सांगणेप्रमाणे लाकडी कपाटाचे वरील कप्प्यांमध्ये ठेवले. तसेच डाव्या हातातील घरकुल योजनेची फाईल कपाटाच्या खालच्या कप्प्यामध्ये ठेवली. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन मला लाच स्विकारल्या नंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 17.30 वा.केला. परंतु मी घाबरल्याने मोटार सायकल चालु करुन पंचायत समिती कार्यालयाचे मुख्य गेटवर जावुन थांबलो. त्यावेळी पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार श्री.गारदे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. त्यावेळी ग्रामसेवक श्री. पवार व पंच क्र.1 कुर्लेकर हे देखील माझे पाठोपाठ पंचायत समिती कार्यालयाचे आतील गेट समोर खाली आल्याने त्यांना सापळा पथकाने पकडले. त्यावेळी पोनि/शेख यांनी ग्रामसेवक श्री.पवार यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/शेख यांनी पंच क्र-1 श्री.कुर्लेकर यांना विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.-1 श्री.कुर्लेकर यांनी सांगितले की, "ग्रामसेवक श्री.पवार यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन त्यांचेसांगणे प्रमाणे लाच रक्कम 11,500/-रु. पंचायत समिती कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील कृषी विभागाचे कक्षातील एका लाकडी छोट्या कपाटामधील कप्प्यामध्ये ठेवली आहे, असा खुलासा पंच क्र.1 श्री.कुर्लेकर यांनी केला. त्यावेळी ग्रामसेवक श्री.पवार हे घाबरलेले होते.

त्यानंतर पोनि/शेख, मी, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य असे लोकसवेक श्री.पवार यांचेसह पंचायत समिती कार्यालय माजलगावचे पहिल्या मजल्यावरील कृषी विभागाचे कक्षामध्ये गेलो. पोनि/शेख यांनी ग्रामसेवक श्री.पवार यांना त्यांचे नाव, पद विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव विजय गोपीनाथ पवार, वय-45 वर्ष, व्यवसाय-नौकरी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिंपे टाकळी, अतिरिक्त पदभार ग्रामपंचायत कार्यालय, तेलगाव ता. माजलगाव जि.बीड रा.सोनखेड ता.सोनपेठ जि.परभणी ह.मु.मंजरथ रोड, भाटवडगाव ता.माजलगाव जि. बीड वर्ग-3 असे सांगितले. पोनि/शेख यांनी ग्रामसेवक श्री.पवार यांना लाचरकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम कृषी विभागातील लाकडी छोट्या कपाटाचे वरच्या कप्प्यामध्ये असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि/शेख यांनी पंच क्र.2 श्री.वडचकर यांना लाकडी कपाट उघडुन वरच्या कप्प्यातील लाच रक्कम बाहेर काढुन ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावर पंच क्र.2 यांनी श्री.वडचकर यांनी लाचरक्कम ताब्यात घेतली व पंच क्र.1 श्री.

कुर्लेकर यांनी लाचेच्या नोटांचे वर्णन व क्रमांक नमुद असलेला कागदावरील नोटांचे क्रमांक पंच क्र.2 वडचकर यांना वाचुन दाखवले असता पंच क्र. 2 श्री.वडचकर यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे सांगुन लाच रक्कम 11500/-रु. असल्याचे सांगीतले. पोनि/शेख यांनी सदरच्या नोटा पंच क्र.2 वडचकर यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर मी पोनि/शेख यांना माझी घरकुलाची फाईल सदर लाकडी कपाटाचे खालच्या कप्यामध्ये ठेवली असल्याचे सांगीतलल्याने पोनि/शेख यांनी सदरची फाईल त्यांचे स्वत:चे ताब्यात घेतली.
पोनि/शेख यांनी घटनास्थळावरील उर्वरित कारवाई कृषी विभागाचे कक्षात पुर्ण केली. त्यानंतर पोनि/शेख यांनी ग्रामसेवक श्री.पवार यांना मी लाचमागणी पडताळणी दरम्यान त्यांचेकडे दिलेल्या माझे कामासंदर्भातील कागदपत्रांविषयी विचारणा केली. त्यावेळी त्यांनी सदरचे कागदपत्र हे त्यांचे मोटार सायकल क्रमांक MH-44 H-5020 चे प्लास्टीकचे डिक्कीमध्ये ठेवले असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/शेख, दोन्ही पंच, मी, ग्रामसेवक श्री. पवार व सापळा पथकातील सर्व सदस्य पंचायत समिती कार्यालयाचे आवारात लावलेल्या ग्रामसेवक श्री.पवार यांचे मोटार सायलक जवळ जावुन ग्रामसेवक श्री.पवार यांनी मोटार सायकलची डिक्की उघडुन त्यामधील माझे कामा संदर्भातील कागदपत्र पोनि/शेख यांचेकडे दिले. त्यानंतर पोनि/शेख यांनी पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/शेख, मी, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, ग्रामसेवक श्री.पवार असे शासकीय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे आलोत.
तरी दि.05/03/2025 रोजी 13.50 वा. ते 14.30 वा.चे दरम्यान विजय गोपीनाथ पवार, वय-45 वर्ष, व्यवसाय-नौकरी, ग्रामाविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिंपे टाकळी, अतिरिक्त पदभार ग्रामपंचायत कार्यालय, तेलगाव ता.माजलगाव जि.बीड रा.सोनखेड ता.सोनपेठ जि.परभणी ह.मु.मंजरथ रोड, भाटवडगाव ता. माजलगाव जि.बीड (वर्ग-3) यांनी माझ्याकडे माझे नातेवाईक श्री.अकुंश बाबासाहेब गवते रा.शिंपे टाकळी यांचे नावे मौजे शिंपे टाकळी ता.माजलगाव जि.बीड येथे गट नंबर 22 मधील 25 आर जमीन पैकी 1 आर जमीन त्यांचे संमतीने माझे वडील श्री.नामदेव सखाराम वैद्य यांचे नावे गाव नमुना नंबर 8 ला नोंद करुन पिटीआर देण्यासाठी 12,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 11,500/-रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन दि. 05/03/2025 रोजी 17.30 सुमारास पंचायत समिती कार्यालय, माजलगाव येथील कृषी विभागाचे कक्षामध्ये लाच रक्कम 11,500/-रुपये पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता ग्रामसेवक श्री.पवार यांना लाचेच्या रकमेसह पकडले म्हणुन माझी ग्रामसेवक श्री.पवार यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
हि फिर्याद दिली ती माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मला वाचुन दाखवली ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAHUL KAMAJI SURYATAL(I (Inspector)) / POBN80785 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
राजगड (श.) पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAHUL KAMAJI SURY
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN80785